| MHAU110005162025 | <u>नियमित दिवाणी दावा क्र. २८/२०२५</u><br>**<u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>**<br>**(कुशीवर्ताबाई लकडे वि. चंद्रकांत शिरसाठ)** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी यांचेविरूध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाव्याच्या अंतीम निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई ताकीद मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. वादी यांच्या कथनाप्रमाणे मौजे लोहगडनांद्रा, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद येथील गट क्र. ४५ एकुण क्षेत्र ५ हे. २९ आर पो. ख. ५७ आर पैकी २ आर शेतजमीन (विहीरीसाठी) चतु:सिमा

पुर्वेस – कौतीकराव शिरसाठ यांची शिल्लक जमीन,

पश्चिमेस – गायराण,

दक्षिणेस – कौतीकराव शिरसाठ यांची शिल्लक जमीन आणि

उत्तरेस – सारंग शिरसाठ व तातेराव लकडे यांची जमीन आहे.

अशा प्रकारे परिशिष्ठ २ मध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत ही या दाव्याचा वाद विषय आहे. यापुढे वाद मिळकतीला **दावा मिळकत** असे संबोधण्यात येते.

०३. वादी यांच्या कथनाप्रमाणे, दि.१८.११.२०१८ रोजी नोंदणीकृत खरेदी खत क्र.२४९३/२०१८ अन्वये वादी क्र.१ याने नमुद दावा मिळकत कौतिकराव शिरसाठ यांच्याकडुन विहीरीसाठी विकत घेतली. दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र.१ या कायदेशीर मालक व ताबेदार आहेत. त्यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.१२२४ नुसार दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी झाली. वादी क्र.१ व २ हे पती पत्नी असुन त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने त्यांनी घरच्या घरी दावा

मिळकतीवर २ ते ३ पुरुस खोदकाम केले होते. त्यानुसार वादी क्र.१ यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.१५०४ नुसार महसुल अभिलेखात झालेली आहे. त्यांना पैशाची कमतरता असल्याने विहीरीचे पुढील खोदकाम करता आले नाही.

०४. वादी पुढे असे कथन करतात की, विहीरीचे खोदकाम करण्यासाठी त्यांना शासनाकडुन अनुदान मंजुर झाले. त्यानुसार दर दिवशी रक्कम रु.१०,०००/- दराने पोकलेन मशीनच्या सहाय्याने खोदकाम चालु केले. सदर दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा कुठलाही कायदेशीर हक्क संबंध नसतांना दावा मिळकतीत येवुन शिवीगाळ करत आहे, विहीरीची खोदकाम करु नये याकरीता वादी व पोपलेन मशीन चालकांना धमकावत आहे.

०५. दि.०९.०२.२०२५ रोजी दावा मिळकतीमध्ये विहीरीची खोदकाम चालु असतांना प्रतिवादी तेथे येवुन त्याने बांधकामास विरोध केला. त्यानंतर वादी यांनी पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. दि.०७.०३.२०२५ रोजी प्रतिवादी हे पुन्हा दावा मिळकतीत आले व वादीचे चालु असलेले खोदकाम बंद करण्याचा प्रयत्न केला, त्यावेळीही वादी यांनी पोलीस ठाण्यात तक्रार केली.

०६. दि.१०.०४.२०२५ रोजी वादी विहीरीचे खोदकाम करत असतांना प्रतिवादी हे संगनमताने दुपारी ०४.००-०४.१५ च्या दरम्यान दावा मिळकतीत आले व वादी यांना धमकी दिली की, “तुम्ही तेथे विहीरीचे काम करु नका, आम्ही तुमच्याविरुध्द अर्ज दिला असुन अनुदान बंद केले आहे.” त्यावेळी वादी समजावुन सांगत असतांना प्रतिवादी वादी यांना म्हणाला की, “तुम्ही जास्त माजले आहात, आमच्या विरोधात पोलीसात व तहसिल कार्यालयात अर्ज देता, आम्ही तुम्हाला विहीरीच काम करु देणार नाही, जमीनीत येवु देणार नाही, तुम्हाला काय करायचे ते करा.” म्हणुन वादी यांनी सदरचा मनाईचा दावा दाखल करुन त्यामध्ये प्रतिवादी यांच्याविरुध्द कोर्टात मनाईची मागणी केली आहे.

०७. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आपले म्हणणे दाखल करून अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. वादी यांनी दावा मिळकतीच्या खोटया व बनावट चतु:सिमा नमुद केल्या आहेत. वादीने शासनाच्या रोजगार हमी योजनेतुन दावा मिळकतीतील विहीर खोदलेली नाही. वादी यांनी त्यांच्या जुन्या विहीरीवर दर्शवुन शासनाचे विहीरीचे अनुदान हडप केले. तसेच विहीरी ही रोजगार हमी योजने अंतर्गत मजुर लावुन तिचे खोदकाम करावे लागते, खोदकाम होत नसल्यास त्याबाबत शासनाची परवानगी घेवुन काम करावे लागते, अशी कोणतीही प्रक्रिया वादी यांनी अवलंबली नाही.

०८. प्रतिवादी यांनी वादीस दावा मिळकत विहीर खोदकामासाठी शासनाकडुन अनुदान मंजुर झाले व मशीनद्वारे काम सुरु केले, प्रतिवादीने अडथळा केला आणि वादीचे काम बंद केले असे काही घडले नाही. वादीने विहीरीचे खोदकाम प्रतिवादीने कोणत्या तारखेला बंद केले ते नमुद केलेले नाही. प्रतिवादी यांनी मुख्य कार्यवाही अधिकारी, रोजगार हमी योजना यांच्याकडे वादीने खोटे अनुदान मिळवले म्हणुन तक्रार दिली असुन त्यामध्ये संबंधीत कार्यालयाने पंचायती समिती फुलंब्री यांचा अहवाल मागितलेला आहे. त्याप्रमाणे योग्य ती चौकशी होवुन कार्यवाही केली जाईल, अदयाप सदर चौकशी ही प्रलंबित आहे.

०९. सदरची चौकशी स्थगित करण्यासाठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी वादीचे कोणतेही बांधकाम थांबवले नाही, हरकत केली नाही आणि कोणतीही धमकी वादी यांना दिलेली नाही. प्रत्यक्षात वादी यांचे काम बेकायदेशीर असुन शासनानेच त्यांचे काम बंद केले आहे. वादी यांची विहीर पुर्ण झालेली नसतांना सुध्दा बेकायदेशीर रित्या फेरफार नमुद करुन घेतला. वादीच्या विहीरीपासुन ५० फुट अंतरावर प्रतिवादीची विहीर आहे, ही बाब वादीने न्यायालयापासुन लपवुन ठेवली आहे. वरील सर्व कारणांचा विचार होवुन सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

१०. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस सकृतदर्शनी केस आहे का? | आहे. |
| २. | न्यायाचे व सोयीचे समतोलत्व कोणाच्या बाजूने आहे? | वादीचे |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास कशानेही न भरुन येणारे असे नुकसान कोणाचे होईल ? | वादीचे |
| ४. | काय आदेश ? | अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

११. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एन. बी. सोनवणे, प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे विधिज्ञ एम. जी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

## मुद्दा क्र. १ करीता

१२. दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकता याकामी हजर करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या आधारे वादीस या अर्जाचे कामी सकृतदर्शनी केस आहे का? हे पाहणे आवश्यक आहे.

१३. वादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकत ही त्यांची खरेदीची मिळकत असुन विहीर खोदण्याकरीता त्यांनी खरेदी केलेली होती. वादी यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी झालेली आहे. वादी यांची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे त्याने दोन ते तीन पुरुस विहिर खोदली होती. त्यानंतर त्यांना अनुदान मिळाले, त्या अनुदानाप्रमाणे विहीर खोदतांना प्रतिवादी यांनी त्यांना हरकत अडथळा केला.

१४. याउलट, प्रतिवादी यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी जुन्या विहीरीचे काम दाखवुन पैसे हडप केले, खोटे अनुदान लोटले त्याबाबत प्रतिवादी यांनी तक्रार केलेली आहे. सदरचे अनुदान हे रोजगार हमी योजने अंतर्गत मिळाले असुन लोकांकडुन काम करुन न घेता मशीनच्याद्वारे कोणतीही परवानगी न घेता काम चालु केले. वादी यांचे काम शासनाने बंद केले.

१५. अभिलेखावर दाखल दि.२८.११.२०१८ रोजीचे खरेदी पत्र व ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता वादी यांनी दावा मिळकत कौतिक शिरसाठ यांच्याकडुन खरेदी केली असुन त्यांच्या नावाची नोंद ७/१२ पत्रकी झालेली आहे. त्यानंतर वादी यांनी दावा मिळकतीमध्ये विहीर खोदली व त्याची नोंद ७/१२ पत्रकी झाल्याचे प्रथमदर्शणी दिसुन येते. वादी यांच्या कथनाप्रमाणे त्यांच्याकडे पैशाची टंचाई असल्यामुळे त्यांनी पुढील बांधकाम केले नाही.

१६. वादी यांना सदर विहीरीचे बांधकाम करण्यासाठी शासनाकडुन अनुदान मिळाले. त्यानंतर त्याने पोकलेन मशीनच्या सहाय्याने विहीरीचे बांधकाम चालु केले. प्रतिवादी यांच्या कथनानुसार सदरची विहीर ही रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेली आहे. रोजगार हमी योजने अंतर्गत काम करतात मनुष्य बळाचा वापर करुन काम केले पाहिजे आणि शक्य होत नसेल तर शासनाची परवानगी घेवुन यंत्राच्या सहाय्याने काम करता येईल, तशी कोणतीही परवानगी वादी यांनी घेतलेली नाही.

१७. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कार्यालयीन आदेशावरुन वादी क्र.१ यांना विहीर मंजुर झाल्याचे प्रथमदर्शणी दिसुन येते. दि.०४.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयाचे अवलोकन केले असता मनरेगा फक्त रोजगार देणारी योजना नसुन विकासात भर पाडणारी योजना आहे त्याबाबत सुचना दिलेल्या आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार त्यांनी वादी यांचे कोणतेही खोदकाम बंद केले नसुन शासनाने

काम बंद केले असे असे कथन केले आहे. पण त्याबाबत कोणताही प्रथमदर्शी पुरावा अभिलेखावर दिला नाही.

१८. प्रतिवादी यांनी वादी यांनी विहीर मंजुरीसाठी दाखल केलेला अर्ज व कागदपत्रे दाखल केलेले आहे, प्रतिवादी यांनी गट विकास अधिकारी पंचायती फुलंब्री यांच्यार्कडेवादी यांच्यावर गुन्हे नोंद करण्यासंदर्भात अर्ज दिल्याचे दिसुन येते. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे जुन्या विहीरीवर काम दाखवुन वादी यांनी पैसे हडप केले, खोटे अनुदान लोटले, त्याबाबत त्यांनी तक्रार केल्याचे प्रथमदर्शणी दिसुन येते. सदर तक्रार प्रतिवादी यांच्या कथनांनुसार प्रलंबित आहे. त्या संदर्भात प्रतिवादी यांना इतर पर्यायी उपाय आहेत. तसेच सदर बाबी हया पुराव्याअंती पाहणे योग्य व उच्चीत होणार आहे.

१९. प्रतिवादी यांच्या कथनानुसार त्यांची विहीर ५० फुट अंतरावर आहे, त्याबाबत ७/१२ उता–या व्यतिरिक्त कोणताही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. वादीयांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरुन प्रथमदर्शणी असे दिसुन येते की, दि.०९.०२.२०२५, ०७.०३.२०२५ व १०.०४.२०२५ रोजी प्रतिवादी यांनी त्यांच्या विहीरीच्या बांधकामामध्ये अडथळा केला व बांधकाम बंद पाडले. वादी हे पोकलेन मशीन प्रति दिवस १० हजार रुपये भाडेतत्वावर घेवुन काम करत असल्याचे नमुद केले आहे.

२०. दोन्ही विद्वान विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसून येते की, दावा मिळकत ही वादी यांची असल्याबाबत वाद नाही असे प्रथमदर्शणी दिसुन येते. तसेच, वादी यांनी गट विकास अधिकारी यांना दिलेल्या तक्रारीवरुन व त्यांची विहीर दावा मिळकती पासुन ५० फुट अंतरावर आहे, यावरुन दावा मिळकतीत सुरु केलेल्या बांधकामास प्रतिवादी यांनी हरकत अडथळा केल्याचे व बांधकाम बंद पाडल्याचे प्रथमदर्शणी दिसुन येते.

दावा मिळकतीतील विहीर ही वादी हे त्यांची मिळकतीमध्ये सुधारणा करण्यासाठी व पिके घेण्यासाठी करत आहे. म्हणुन प्रस्तुत अर्जाच्या कामी वादी यांना सकृतदर्शनी कथन असल्याने मी मुद्दा क्र. १ बाबत होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

## मुद्दा क्र. २ व ३ करीता

२१. सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्याची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीतरित्या विचारासाठी घेतले आहेत.

२२. साधारणपणे सोईचे, न्यायाचे समतोलत्व व नुकसानीचे तत्व सकृतदर्शनी कथनासोबत चालते. सकृतदर्शनी वादी त्यांच्या दावा मिळकतीत विहीरीचे काम व बांधकाम करत असल्याचे सिध्द झाले आहे. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास प्रस्तापित परिस्थितीत बदल होऊन वादीचे असणारे कायदेशीर हक्क डावलले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच त्यांनी पोकलेन मशीन प्रति दिवस १० हजार रुपये भाडेतत्वावर घेवुन कामकाज करत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांचे कशानेही न भरून येणार असे आर्थिक नुकसान होणार आहे. सबब सोईचे समतोलत्व व नुकसानीचे तत्व हे देखील वादीच्या बाजूने आहे. सबब मुद्दा क्र. २ व ३ बाबत वादीच्या बाजुने निष्कर्ष नोंदवित आहे.

## मुद्दा क्र. ४ करीता

२३. अभिलेखावर दाखल केलेली कागदपत्रे व विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद या गोष्टींचा विचार करता वादीस सकृतदर्शनी केस आहे, असे स्पष्ट होते. तसेच न्यायाचे सोयीचे समतोलत्व व नुकसानीचे तत्व वादीच्या बाजूने असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज सदर प्रतिवादीविरुध्द खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. सदर अर्जाच्या कामी केलेला ऊहापोह व मांडलेले निष्कर्ष या अर्जापुरतेच मर्यादित असून याकामी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवर आधारित आहेत. त्यामुळे मूळ

दाव्याच्या चौकशीवेळी दोन्ही बाजूंचे पक्षकार या अर्जावरील आदेशाचा आधार घेऊ शकत नाहीत. सबब मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष दाखल खालील आदेश पारीत करत आहे.

| **आ दे श** | |
|---|---|
| १. | अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो. |
| २. | प्रतिवादी यांनी स्वत: अगर त्रैयस्त व्यक्ती यांनी वादी यांच्या दावा मिळकतीतील पोकलेन मशीनच्या सहाय्याने सुरु असलेले खोदकाम, बांधकाम व उपभोगामध्ये कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये, अशी त्यांच्याविरुध्द दाव्याच्या निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई ताकीद देण्यात येत आहे. |

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL

Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2026.02.05 13:43:43 +0530

**(चंद्रकांत रा. पाटील)**

**दि. ०५/०२/२०२६**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**फुलंब्री.**

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***K. M. Shinde*** |
| Court | : | Jt. Civil Judge Jr. Dn., & Judicial Magistrate F.C., Phulambri. |
| Date of order | : | 05/02/2026 |
| Signed by the Presiding Officer on | : | 05/02/2026 |
| Order Uploaded on | : | 06/02/2026 |